फक्त सभासदांसाठी
वर्ष ४२वे, अंक ९वा * जानेवारी २०२४

सभा : मंगळवारी संध्या. ७.०० वा.
SNDT महाविद्यापीठ, रोटरी हॉल,
कर्वे रोड, पुणे ३८

# स्नेह सेवा

## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

* अध्यक्ष *
नीलिमा भडभडे
मो. ९७६७९१६५४०

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

* संपादक *
विजय राव
मो.९१५८८३८९८९

## संपादकीय

सस्नेह नमस्कार.

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानम् अधर्मस्य तदात्मानम् सृजाम्यहम् ।।
परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।

श्रीमद्भगवद्गीतेतील हे आश्वासक वचन सत्यात अवतरित होण्याची चिन्हे आपल्या देशात दिसत आहेत. सुसंवादी, सत्प्रवृत्त, सुखी सहजीवनासाठी सर्व समाजात वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना रुजायला हवी असते. प्रखर चढाओढीच्या प्रस्तुत जागतिक वातावरणात असे ध्येय साध्य होण्यासाठी सर्वांना एकविचाराने पुढे नेणाऱ्या नेतृत्वाची गरज असते. हळूहळू ते फलद्रूप होईल का, निसर्गविरोधी कृत्यांपासून मानव निसर्ग-जोपासनेकडे वळेल का, भावी पिढीसाठी भविष्यकाळ एक मृगजळ न ठरता एक समृद्ध, सुसंस्कृत जागतिक सामंजस्य उदयाला येईल काय, हीच विवंचना आज सगळ्यांच्या मनात घोळत आहे.

मानवाने विविध क्षेत्रात शास्त्र व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दैदिप्यमान प्रगती केलेली असली तरी जगातील पराकोटीचा असमतोल, विरोधाभास, असुरक्षितता कमी झालेली नाही. कारण, निसर्गापासून स्वत:चे विभाजन करून स्वतंत्र, स्वकेंद्रित अस्तित्व निर्माण करण्याच्या मानवी प्रयत्नात विश्वाच्या एकात्मकतेचा भंग होवून नैसर्गिक चैतन्य आणि ऊर्जेचा अक्षम्य अपव्यय व ऱ्हास मानवाकडून होत आहे.याची जाणीव होऊन, जागतिक स्तरावर मानव पुन्हा निसर्गाभिमुख होईल काय आणि अधोगतीकडे झुकलेली आपली धरणीमाता पुन्हा सुजलाम् सुफलाम् होईल काय, या सचिंत मनाने आपण नूतन वर्षाचे स्वागत करीत आहोत.

स्नेहसेवेसारखी सेवाभिमुख संस्था आणि विविध क्षेत्रात संस्मरणीय कार्य करणारे संस्थेचे सन्माननीय सदस्य यांच्या प्रेमळ सहवासातून व कार्यातून समाजाला खूप चांगली, सकारात्मक प्रेरणा मिळत आहे. खरं म्हणजे अशाच असंख्य संस्था आणखी निर्माण होऊन आपल्या देशातील उत्साही तरुण पिढीला, तसेच दीर्घानुभवी परिपक्व ज्येष्ठ मंडळींना 'एकमेकां साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ !' असा जीवनक्रम अनुसरण्यास प्रेरित करतील अशी अपेक्षा आपण करूयात.

धन्यवाद आणि नूतन वर्षाभिनंदन !

**विजय राव.**

## डावखुऱ्यांचे विश्व

दि.५/१२/२०२३ रोजी एका अगदी वेगळ्या विषयावर श्री बिपीनचंद्र चौगुले ह्यांनी स्नेहसेवेतील सदस्यांना अभ्यासपूर्वक व्याख्यान दिले; विषय होता डावखुऱ्यांचे विश्व.

स्नेहसेवेच्या सदस्या श्रीमती रीताराणी शितोळे ह्यांनी श्री चौगुले यांची ओळख करून दिली. अनेक विषयांच्या बाबतीत त्यांनी कार्य केलेले आहे. बालचित्रवाणीचे ते २८ वर्षे निर्माता होते. आकाशवाणीवर वृत्त निवेदक म्हणून त्यांनी काम पाहिले होते. अनेक भारतीय व परदेशी वाहिन्या, तसेच निर्मितीसंस्थांसाठी, त्यांनी व्यावसायिक व सामाजिक माहितीपट तयार केलेले आहेत. अनेक लघुपटांचे दिग्दर्शन त्यांनी केलेले आहे. अशा विविधरंगी कार्यानंतर त्यांनी डावखुऱ्यांच्या विश्वात प्रवेश केला आणि त्यांच्याबद्दल लोकांना माहिती देणे, डावखुऱ्या लोकांना मार्गदर्शन करणे, डावखुऱ्या मुलांच्या पालकांना शास्त्रीय माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करणे, यासाठी त्यांनी सन १९९१ मध्ये असोसिएशन ऑफ लेफ्ट हँडर्स या संस्थेची स्थापना केली. सध्या ह्या संस्थेचे ते विद्यमान अध्यक्ष आहेत.

अतिशय मनोरंजक अशी माहिती देत, हसत खेळत, त्यांनी डावखुऱ्यांचे विश्व लोकांना उलगडून दाखवले. डावखुऱ्यांना येणाऱ्या अडचणी कथन करताना त्यांनी लिहिणे, खेळणे, कामे करणे, धार्मिक गोष्टींमध्ये डावा हात वापरणे कसे त्रासदायक ठरते, हे सोदाहरण, खुलासेवार सांगितले.

मानवी शरीर रचना व मेंदूची रचना, आणि त्याचा डावखुरेपणाशी असलेला संबंध, सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत, चित्रप्रक्षेपणाद्वारे त्यांनी उत्तमरित्या समजावून दिला.

जगात सरासरी ९० % जनता उजखोर आहे, त्यामुळे बहुतांश यंत्रे इत्यादी ही उजव्या हाताने चालविण्यासाठी तयार केलेली असतात. तिथे ह्या डावखुऱ्या मंडळीना काम करता येणे, अशक्य होऊन बसते. त्यामुळे अशी यंत्रे, वस्तू, खेळ-साहित्य वगैरे वापरणे, त्यांना जमत नाही व त्यांची कुचंबणा होते; त्याचा कामाच्या ठिकाणी त्यांच्या उत्पादन व निर्मिती क्षमतेवर परिणाम होतो. ह्या असमर्थतेमुळे त्यांच्या करिअरवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. तथापी, डावखुरे असूनसुद्धा, क्रिकेटचा बादशहा सचिन तेंडुलकर, अभिनय सम्राट अमिताभ बच्चन, फुटबॉलपटू पेले (लेफ्ट फूटर) ह्यांनी आपापल्या क्षेत्रात यशाचे शिखर गाठले आहे.

डावखुऱ्यांना मदत करणे हेच आपल्या जीवनाचे ध्येय ठरविलेल्या श्री चौगुले यांनी समाजाला जाता जाता एक संदेश दिला आहे : मारून मुटकुन डावखुऱ्या मुलाला उजखोर बनविण्याचा प्रयत्न करू नका. हा कांही रोग नाही; यात अशुभ असे काहीही नाही. तेंव्हा त्यांना त्यांचे जीवन सुकर होण्यासाठी हातभार लावा. तसेच उजखोर लोकांनी आपला डावा हात छोट्या छोट्या कामांसाठी वापरायला सुरवात केली, तर त्यांचे लहान सहान आजार नक्कीच कमी होतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

श्री चौगुले हे असोसिएशन ऑफ लेफ्ट हँडर्सच्या माध्यमातून डावखुरेपणावर व्याख्यान देणे, समुपदेशन करणे, चर्चासत्र घडविणे, माहिती संकलित व वितरित करणे, चाचण्यांचे आयोजन करणे अशी विविध प्रकारची कामे करीत असतात. तसेच नियतकालिके, चित्रवाणी, नभोवाणी, इंटरनेट आदि माध्यमांद्वारे ह्या विषयाचा ते प्रचार व प्रसार करीत असतात.

श्री चौगुले ह्यांचे आभार मानताना स्नेहसेवेचे सभासद डॉ. पांडे सर यांनी, काही खेळांमध्ये डावखुरेपणा ही जमेची बाजूही ठरते असे प्रतिपादन केले. अशा प्रकारे डावखुऱ्यांच्या विश्वातील सफरीमुळे डावखुरेपणा संदर्भातील अनेक बाबींचा खुलासा व उद्बोधन झाले.

त्यानंतर अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

**उज्वला नाईक**

## आरोग्य शिबीर

२२/१२/२०२३ रोजी स्नेहसेवा व मैत्रेय चारिटेबल सोसायटीतर्फे लॉ कॉलेज रोडवरच्या MVM सेमी-इंग्लिश मिडीयम स्कूल येथे ४ ते ७ वयोगटाच्या मुलांची शारीरीक तपासणी केली.

आपले सभासद डॉ. मुकुंद संगमनेरकर व डॉ. राधा संगमनेरकर, डॉ. अभिषेक सिंग, नर्स सोनाली, डोळ्यांच्या डॉक्टर डॉ. प्रिती अभ्यंकर, दातांच्या डॉक्टर डॉ. निवेदिता पांडे कुलकर्णी ह्यांनी मुलांची तपासणी केली व शिबीर संपन्न झाले.

अध्यक्षा डॉ. निलीमा भडभडे यांनी डॉक्टरांचे स्वागत केले. मुख्याध्यापिका सौ. मुक्ता पेंडसे व शिक्षक यांचेही स्वागत केले.

लहान लहान मुले वर्गातून शिस्तीत येत होती. वजन उंची, डोळे तपासणी, दांत तपासणी, व शारीरिक चेकप आनंदाने करून घेत होती; त्यांच्या हातात दिलेल्या कार्डावर तपासणीची नोंद करून घेत होती. शिक्षकांचे त्यांच्याकडे पूर्ण लक्ष होते.

सर्वांची तपासणी झाल्यावर शाळेतर्फे मुलांचा ख्रिसमसचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. मुले गाणी गात होती, नाचत होती. सौ. रेखाताईंनीही मुलांसाठी छोटे गाणे तयार करुन आणले होते. तेही मुलांनी आनंदाने म्हटले. सर्वांना अल्पोपहार स्नेहसेवेतर्फे होता.

या शिबिरासाठी सौ. रेखा कसरेकर, सौ. प्रज्ञा यार्दी, सौ. ऋचा सावरकर, प्रा. श्याम भुर्के, व सौ. सुनिता वाघ हे सभासद उपस्थित होते. सौ. रेखाताईंनी या शिबिराची आंखणी केली.

**सुनिता वाघ**

## संस्था भेट :

पुणे गुजराथी केळवणी मंडळ (PGKM) शाळा, एच् व्ही. देसाई विद्याधाम, कोंढवा, पुणे.

स्नेहसेवा सभासदांची ही संस्था भेट दि. २१-१२-२०२३ रोजी संपन्न झाली. सकाळी १० ते दुपारी १.३० पर्यंत या भेटीचा आनंद २५ सभासदांनी घेतला.

पुणे गुजराथी केळवणी मंडळातर्फे सुरू झालेली ही शाळा पुण्यात कोंढवा परिसरात स्थित आहे. ही शाळा जरी या ट्रस्टने सुरू केलेली असली तरी ही शाळा सुरू करण्याच्या वैचारिक अंकुरापासून ते उत्तम व्यवस्था व सुविधांसह आज शाळेची जी भव्य वास्तू उभी आहे, त्यामागे सौ. नलिनीताई आणि श्री मोहनराव गुजराथी यांचे खूप मोठे योगदान आहे. तसेच वैचारिक कल्पना ते वास्तवातील अस्तित्व हा चमत्कार केवळ गेल्या पाच वर्षात घडला आहे. ही नाविन्यपूर्ण संस्था म्हणजे सौ. नलिनीताई आणि श्री मोहनराव यांच्या विचारांचेच अपत्य म्हणता येईल.

'पूर्वीच्या काळी साधी राहाणी आणि उच्च विचारसरणी!' असा विचार समाजात रूढ होता; परंतु आताच्या बदलत्या समाजातील विचार 'उच्च राहाणी आणि उच्च विचारसरणी!' असा झाला आहे. या संस्थेच्या शाळेत उपलब्ध करून दिलेल्या सुविधा अगदी उच्च प्रतीच्या आहेत आणि त्याद्वारे मिळालेले शिक्षणही केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न राहाता प्रत्यक्ष अनुभव आणि परीक्षेच्या

सीमेपलीकडील कल-आधारित प्रशिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना इथे दिला जातो.

सौ. नलिनीताईंनी या संस्थेसाठी 'धियो यो नः प्रचोदयात्।' हे बोधवाक्य निवडले आहे. बुद्धीच्या (शिक्षणाच्या) सहाय्याने आमचे जीवन प्रेरणादायी - तेजस्वी होऊ दे ! ही कल्पनाच किती सुंदर आणि विशाल आहे !

तसेच श्री मोहनरावांच्या संकल्पनेनुसार ही शाळा कॉन्व्हेंट हिंदू स्कूल अशी कार्यान्वित केलेली आहे. कॉन्व्हेंट शाळांमधील कडक शिस्त आणि त्याबरोबरच सनातनी हिंदू जीवनपद्धतीतील सर्वसमावेशक (Holistic) व्यापक विचार यांची छाप येथील सर्व विभागात जाणवते.

मोहनरावांनी सांगितल्याप्रमाणे २०१६ मध्ये ही शाळा सुरू करण्याचा विचार केल्यानंतर २०२२ च्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी येथील प्रथम-प्रवेश सुरूही झाले. तसेच मोहनरावांच्या दूरदृष्टीचेही कौतुक करायला हवे. सोलापूर रस्ता ते सातारा रस्ता या पुणे शहराच्या चतुर्थांश भागात नांवाजलेल्या शैक्षणिक संस्था फारच कमी आहेत. त्यामुळे या शाळेच्या शुभारंभानंतर इतक्या अल्पावधीतच, केवळ दुसऱ्याच वर्षात येथील विद्यार्थ्यांची पटसंख्या ८५० इतकी झाली आहे, हेही मोठे कौतुकास्पद आहे.

शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. प्राजक्ता भिडे यांनी संस्थेच्या कार्याची तपशीलवार माहिती दिली. स्नेहसेवामधील शैक्षणिक क्षेत्रात नांवाजलेल्या सदस्यांनाही ही माहिती एक नवी दृष्टी देऊन गेली. प्राजक्ताताईंनी सणांनुसार केलेले अनेक प्रकल्प विशद केले. तसेच प्रत्येक महिन्यात एक देश निवडून त्यासंदर्भात विद्यार्थ्यांनी तयार केलेले, चित्रकलेपासून विविध विषयात त्यांची अभिरुची वाढवणाऱ्या इतर कलाकृती आणि छोटे छोटे प्रकल्प त्यांनी सर्व वर्गांवरून फेरी मारतांना सर्वांना दाखविले.

'Academics' अर्थात् केवळ पुस्तकी शिक्षणाला अवाजवी महत्व न देता, इतर कला, खेळ आणि जीवनोपयोगी कौशल्ये विद्यार्थ्यांना कशी शिकविली जातात याचे प्रात्यक्षिक सगळीकडे पाहायला मिळाले.

सगळ्यांना आवडलेली आणखी एक सोय म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गाबाहेर उपलब्ध करून दिलेले त्यांचे सर्व साहित्य ठेवण्याचे कप्प्यांचे कपाट; परंतु कप्प्यांना कुलूप अजिबात नसते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यात कमावलेली सगळ्यात मोठी संपत्ती म्हणजे परस्पर विश्वास. विद्यार्थी त्यांचे सर्व साहित्य या बिन-कुलुपी कप्प्यांत निर्धास्तपणे ठेवतात. किती छान असे प्रत्यक्ष कृतीतून दिलेले जीवनोपयोगी शिक्षण आहे हे !

कोणा विद्यार्थ्यांची जर शाळेतील एखाद्या विभागात उपस्थित राहून तेथील कार्यशैली शिकून घेण्याची इच्छा असेल तर त्यांना तशी मुभा दिली जाते; उदा: भांडार व्यवस्थापन व खानपान व्यवस्थापन इत्यादी.

या शाळेतील फी इतर शाळांप्रमाणेच व्यवस्थित आहे. त्यात कसली सवलत नाही आणि शैक्षणिक गुणवत्तेतही कसलीही कमतरता नाही. प्रत्येक चांगल्या गोष्टीचे मूल्य असते आणि अशा संस्थांचा, पर्यायाने समाजाचा विकास होण्यासाठी ते मूल्य देण्याची आपली मानसिक तयारीही हवी.

या भेटीच्या संपूर्ण वेळेत संस्थेचे व्यवस्थापक श्री खासनीस आमच्या सोबत होते. या शाळेला श्री केदार वाळिंबे आणि पुण्यातील मिलेनियम या शैक्षणिक संस्थेचे मार्गदर्शनही लाभले आहे.

ही संस्थाभेट अतिशय संस्मरणीय झाली.

स्नेहसेवेचे माननीय सदस्य डॉ. दिनेश पांडे यांनी या भेटीची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थाचालकांचे यथोचित आभार मानले.

त्यानंतर संस्थेकडून स्नेहसेवा सभासदांना दिल्या गेलेल्या स्वादिष्ट भोजनाने या भेटीची सांगता झाली.

**मधुरा बांदिवडेकर**

## *तिसरी सर्वसाधारण सभा*

मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी आणि स्नेहसेवा यांची तिसरी सर्वसाधारण सभा मंगळवार २६ डिसेंबर२०२३ रोजी झाली.

२६ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या दुसऱ्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सचिव सौ सुनिता वाघ यांनी वाचून दाखवले आणि इतिवृत्त मंजूर करण्यात आले. खजिनदार श्री अरविंद भडकमकर यांनी सदस्यांना आधीच प्रसारित केलेल्या खर्च आणि उत्पन्नाच्या विवरणाबद्दलच्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्यांनी सैनिक स्नेह प्रकल्पासाठी मोठ्या देणग्या देणाऱ्या देणगीदारांची नावे सांगितली.या प्रकल्पासाठी चितळे बंधूंव्यतिरिक्त इतर मिठाई विक्रेत्यांचाही शोध घ्यावा, असे मत काही सदस्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षा डॉ निलिमा भडभडे यांनी आरोग्य प्रकल्पाच्या उपक्रमांचे, विशेषत: हिंगणे येथील अपंगांच्या शाळेसाठी केलेल्या तरतुदीचे वर्णन केले. मैत्रेय सोसायटीने लॉ कॉलेज रोडवर असलेल्या एमव्हीएम सेमी-इंग्लिश स्कूलच्या ४ ते ७ वयोगटातील मुलांसाठी आरोग्य शिबिरही घेतले.

सभेचे कामकाज संपल्यानंतर उपस्थित सर्वांनी डिसेंबरमध्ये वाढदिवस साजरा करणाऱ्या सदस्यांना शुभेच्छा दिल्या आणि डिसेंबरचे कार्यक्रम आयोजित करणाऱ्या गट क्रमांक ९ च्या सदस्यांचे कौतुक केले. गट क्रमांक ९ च्या सदस्यांनी आयोजित केलेल्या अल्पोपहाराने सभेची सांगता झाली.

**नीलिमा भडभडे**

## *अध्यक्षांचे मनोगत* :
## (कै.) सौ. मंजिरी गोडबोले.

(१५ ऑगस्ट १९९९ रोजी स्नेहसेवाला १० वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त काढलेल्या स्मरणिकेच्या अंकातील मनोगत.)

स्नेहसेवाला १० वर्षे पूर्ण झाली. संस्थेच्या आयुष्यात १० वर्षे हा काही फार मोठा पल्ला नव्हे. १० वर्षांच्या वाटचालीचे फलित काय ? समाजाला संस्थेचा उपयोग झाला का ? संस्थेच्या सभासदांचे व्यक्तिमत्व जास्त समृद्ध झाले का ?

गेल्या १० वर्षात खूप धडपड केली; पण खूप यश मिळाले, खूप काम झाले, असे म्हणणे अवघड आहे. अजून खूप काही होऊ शकले असते. आम्हीही पूर्ण समाधानी नाही. पण आपापले संसार, व्यवसाय, यांच्या व्यापातून उरलेल्या वेळात करायच्या कामाला काही मर्यादा पडतात.

एकेकटा माणूस कितीही कर्तबगार, समाजऋण मानणारा असला तरी तो एक 'शक्ती' होऊ शकत नाही. अशी अनेक माणसे एकत्र येऊन समाजातील उणीवांचा, गरजांचा आणि त्यावरील उपायांचा विचार करून काही कृती करू इच्छितात, तेव्हा ती एक शक्ती बनते. स्नेहसेवाचे सभासद दर मंगळवारी एकत्र येऊन काही व्याख्याने ऐकतात, चर्चा करतात, एकमेकांशी संवाद करतात, तेव्हा समाजाला उपयुक्त अशी एक विचारधारा त्यांच्या नकळत त्यांच्यात निर्माण होते. एरवी सामाजिक समस्यांबद्दल फारसा जागरूक नसणारा अलिप्त वृत्तीचा माणूसही अशा समूहाचा एक भाग झाला की त्या समूहासारखाच विचार आपोआप करू लागतो आणि कृतीतही मागे पडत नाही. हे सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे काम स्नेहसेवामध्ये फार उत्तम तऱ्हेने पार पडले आहे.

या जाणिवेतूनच अनेक समाजोपयोगी उपक्रम – खानापूर शिबीर परिसर, औषधपेढी, दुष्काळ निवारणासाठी पंपदुरुस्ती, गरजू मुलांना शिष्यवृत्ती आणि असे इतर कितीतरी प्रकल्प साकार झाले. स्नेहसेवाचे सर्व सभासद कमी जास्त प्रमाणात या उपक्रमातून आपापल्या परीने हातभार लावत असतात; पण एकदा काम पुरे झाले की ते सर्वांचे असते. आपल्याला अभिमान वाटावा, असे आपल्या हातून काही घडले आहे, एका कर्तबगार समूहाचे आपण एक भाग आहोत, ही जाणीव माणसाला निश्चितच आनंदित करणारी आणि त्याचा आत्मविश्वास वाढवणारी असते.

आणखीही एका कारणासाठी स्नेहसेवासारख्या संस्थांची समाजाला आवश्यकता आहे असे मला वाटते. सध्याच्या कुटुंब रचनेत लहान लहान आत्मकेंद्रित कुटुंबातून नातेवाईकांमधील जिव्हाळा व संबंध खूप वेगाने कमी होऊ लागले आहेत. अशा परिस्थितीत आपल्या अडचणीच्या, दुःखाच्या, आनंदाच्या प्रसंगी हातातले काम टाकून धावत येतील अशी माणसे जोडलेली असणे ही प्रत्येकाची गरज आहे. स्नेहसेवामध्ये असे सुसंस्कृत, सुशिक्षित, उत्तम मूल्ये जोपासणाऱ्या सुहृदांचे एक सुदृढ मित्रमंडळ तयार झाले आहे. वय, सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक परिस्थिती या सर्वांचा कसलाही अडसर न येता, स्नेहसेवाचे सर्व स्त्री-पुरुष सभासद एकमेकांचे जिव्हाळ्याचे मित्र झाले आहेत.

म्हणून मला असे वाटते की पुण्यात आणि सर्व महाराष्ट्रात स्नेहसेवासारख्या अनेक लहान लहान संस्था निर्माण झाल्या पाहिजेत. प्रत्येक विचारी माणसाने अशा एखाद्या गटात सामील झाले पाहिजे. त्या गटाद्वारे समाजाला आपल्या कर्तुत्वाचा लाभ दिला पाहिजे. आणि त्या गटाद्वारे स्वतःही विकसित झाले पाहिजे.

असे अनेक समविचारी गट एकत्र येऊन कोणत्याही सामाजिक, राजकीय, नागरी अन्यायाविरुद्ध एकत्रितपणे प्रतिकार करून सामाजिक स्वास्थ्य निर्माण करू शकतील.

***




### जानेवारी महिन्यातील वाढदिवस
### जीवेत् शरदः शतम्

| | |
|---|---|
| श्री. प्रदीप वाघ | १ जाने. |
| श्री. अरविंद भडकमकर | ७ जाने. |
| सौ. शोभा शहा | १५ जाने. |
| श्री. रवींद्र घाटपांडे | १७ जाने. |
| श्री. सुधाकर जोशी | १९ जाने. |
| सौ. पूर्णिमा तोडकर | २५ जाने. |
| सौ. मिनाक्षी महाजन | २६ जाने. |
| सौ. विजया खोले | २७ जाने. |